# जागतिक श्रम मानके

HUMAN RESOURCES LEGAL & LABOUR RELATIONS DEPARTMENT |
ISSUED: March 1, 2019 – REVISED: April 14, 2025

## प्रस्तावना:

Magna International Inc. ("Magna")व्यावसाय़िक उद्दिष्टांचा पाठपुरावा करतांनाच आमच्या सामाजिक जबाबदा-यांचे संतुलन साधण्याचे महत्व ओळखते. आम्ही स्वीकार करतो की आमचे कार्य विविध हितधारकांच्या अपेक्षांनुसार असावे लागतात, ज्यात समाविष्ट आहेत भागधारक, कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार, समुदाय ज्यामध्ये आपण व्यवसाय करत आहोत, सरकार आणि इतर, विशेषतः आमच्या कर्मचाऱ्यांसोबत योग्य आणि नैतिक वर्तनाशी संबंधित आहेत त्यांच्यासोबत।

हे धोरण Magna संचालित सर्व गट, विभाग आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या सर्वांना जागतिक स्तरावर लागू होते. हे धोरण Magna च्या वतीने काम करणारे, कर्मचाऱ्यांसह, अधिकारी, संचालक, सल्लागार आणि एजंट्स सर्वांनाही लागू होते.

आमचा व्यक्तीविषयक आदर आणि आमच्या कर्मचा-यांच्या गरजा ह्यांचे प्रतिबिंब Magna अद्वितीय कार्यचालन संस्कृतीतून उमटते ज्याला आम्ही "न्यायचित उपक्रम" म्हणून ओळखतो. आमच्या न्यायचित उपक्रम बिझनेस मॉडेलमध्ये आमच्या कर्मचाऱ्यांना आमच्या व्यवसायामधील प्रमुख हितधारक म्हणून मान्यता प्राप्त आहे, ज्यांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य आमच्या मूळ धोरणांमध्ये निश्चित केले गेले आहेत, जसे की Magna कर्मचारी चार्टर, Magna चे ऑपरेशनल सिद्धांत, आणि Magna च्या आचार आणि नैतिकता संहिता धोरणे.

ही ग्लोबल कामगार मानके आमच्या न्यायचित उपक्रम संस्कृतीच्या आराखड्यावरून व सनदीनुसार पालन करत असतांनाचे पुढचे पाऊल म्हणता येईलः

- **युएन (संयुक्त राष्ट्र) मानवी अधिकारांचा वैश्विक जाहिरनामा**
- **ILO मूलभूत गृहीतके**
- **ILO कार्यस्थळाची मूलभूततत्वे आणि हक्क यांचा जाहिरनामा**

आमची कंपनी धोरणाचा फ्रेमवर्क विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक कायद्यांखाली स्थापित मूलभूत त वांवर आधारित आहे, ज्यामध्ये देश/राज्य-विशिष्ट कायदे, स्थानिक स्तरावर लागू श्रम करार, टॅरिफ आणि कराराची जबाबदारी समाविष्ट आहेत, परंतु याच्यापर्यंतच मर्यादित नाही.

## मानवी अधिकारः

आम्ही आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त मानवाधिकारांची पूर्तता करण्याला अनुपालन करतो. आमची कंपनी वैयक्तिक गुणवैशिष्ट्यांचे पलीकडे जाऊन सर्वांना समान वागणूक देण्याचा आणि समान सेवासंधी (नोकरी)देण्याच्या धोरणांचा मान राखते. आमचा असा विश्वास आहे की, आमच्या विविधरंगी, विविधसंस्कृतीसंपन्न कार्यस्थलांमुळे कर्मचा-यांना सन्मानाचे वातावरण पुरवले जाते आणि त्यात त्यांना वैयक्तिक आणि व्यवसायिक विकासाच्या संधी साधत असतांनाच सुरक्षित स्वागत मिळते.

## छळ, भेदभाव आणि हिंसाचारापासून संरक्षणः

Magnaच्या छळ आणि भेदभाव धोरणांशी सुसंगत राहून आम्ही आमच्या कार्यस्थली वंश, राष्ट्रीयत्व किंवा जन्मसमाज, रंग, लिंग, धर्म, लैंगिककल, असमर्थता किंवा इतर कोणत्याही संरक्षित आधारावर मान्यताप्राप्त लागू कायद्यानुसार ठरणारा त्रास सहन करणार नाही. आमचे धोरण कार्यस्थळावरील हिंसा आणि धमकावणीला प्रतिबंधित करतात, ज्यामध्ये प्रशिक्षण आणि देखरेखीशिवाय सुरक्षा दलांच्या नियुक्तीवरही प्रतिबंध आहे. आमच्या कर्मचारी सनदेतील तत्वांनुसार, आम्ही न्याय्य आणि आदरणीय कार्यस्थळे वाढवण्यासाठी उत्सुक असतो जी वशिलेबाजी आणि शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा मौखिकही कोणत्याही प्रकारच्या गैरवापरापासून मुक्त असतील.

## मुलांचे हक्क:

आम्ही बालकामगार ठेवण्याचा धिक्कार करतो आणि मुलांच्या शिक्षण, विश्रांती आणि खेळण्याच्या हक्कांचा सन्मान करतो. आम्ही बालकामगार विषयक नोकरी वा कामांसाठी असणा-या किमान वयाविषयीच्या लागू होणा-या सर्व आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक कायदे व नियम यांचा आदर करतो.

## स्वतंत्रपणे निवडलेली नोकरी:

आम्ही बळजबरी/गुलामी किंवा अनिवार्य कामाच्या सर्व प्रकारांना, जसे की कारागृह काम, कर्ज बंधन, मानवी तस्करी किंवा गुलामी, नाकारतो. Magnaच्या उपकंपन्याही पुरवठादार, भरतीकर्ते किंवा कं  ाटीएजंटस जे सक्तीने मजूर आणतात अशांशी व्यवसाय करीत नाहीत. Magna मोकळेपणी निवडलेल्या नोकरीच्या तत्वाचा आदर करते.

## आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण:

आमच्या जागतिक आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण धोरणानुसार, आम्ही व्यापक जागतिक आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण कार्यक्रम राबवले आहेत. या प्रक्रियेत, आम्ही व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य तसेच पर्यावरण संरक्षणासाठी संबंधित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करतो किंवा त्या मानकांच्या गुणवत्ता प्रमाणापेक्षा अधिक कार्य करतो. आम्ही आमच्या प्रमाणकांचा नियमितपणे आढावा घेतो आणि त्या क्षेत्रात सतत सुधारणा घडवून आणायला सर्वसमावेशक सवलतींचे परीक्षण आणि नजर ठेवण्याच्या प्रक्रियेद्वारे बांधील आहोत.

## काम करण्यायोग्य परिस्थिती:

आम्ही आमच्या कर्मचा-यांचा योग्य विश्रांती आणि विसाव्याच्या वेळेचा हक्क मान्य करतो. आम्ही आमच्या कर्मचा-यांना उद्योगातील प्रचलित पद्धतींनुसार रास्त तास काम पुरवतो जे त्यांच्या आऱोग्य आणि क्षेमकल्याणाची सुरक्षा जपते. आम्ही कामाचे तास, मधला विसावा, सुट्ट्या, व्हेकेशन्स आणि वेळेनंतर अधिक काम या बाबतीतले लागू होणारे स्थानिक नियम आणि कायदे ह्यांच्या सर्व आवश्यकतांची पूर्तता करण्याचे वा त्यांचेपेक्षा अधिक देण्याचे प्रयत्नात असतो.

## भेदभाव रहीत भऱपाईच्या पद्धती:

आमच्या Magna कर्मचारी सनदेच्या तत्वांशी सुसंगत राहून, आम्ही आमच्या कर्मचा-यांना स्पर्धात्मकवेतन आणि असे लाभ, जे आमची उद्योगा अंतर्गत आवश्यक न्याय्यता तसेच बाह्य स्पर्धात्मकता आणि ज्यात आम्ही व्यवसाय करतो ते स्थानिक कामगार मार्केट ह्यांच्या गरजा पुरवायला बांधील आहोत. ह्यात सामावले आहेत, उद्दिष्टांआधारे आणि विना भेदभाव निकषांवर भऱपाई उदा. कौशल्य आणि क्षमता, पा  ता, कामगिरी आणि सेवादीर्घता. आमची भऱपाई धोरणे राष्ट्रीय, राज्य आणि/ किंवा स्थानिक कायदे-नियमांची, विविध कं  ाटदार, कामगार करार आणि करविषयक आवश्यकतांच्या सह जुळती आहेत. देशविशिष्ट भरपाईचे बाबतीत आम्ही अंतर्गत नियमांसंदर्भात आणि करारातील आवश्यकतांनुसार लिंगाधारित भेदभाव न करता समान वेतन तत्वाला पाठिंबा देतो.

## संघटना करण्याची स्वतंत्रता आणि विश्वासपूर्ण सामूहिक वाटाघाटी:

आम्ही आमच्या कर्मचा-यांचा स्थानिक कायदे व नियमांनुसार मोकळेपणी जमून प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार जाणतो, मानतो, त्याचा आदर करतो आणि संबंधित न्यायकक्षेतील लागू असलेल्या औद्योगिकसंबंध पद्धतींचा मान राखतो. आम्ही पुढे हे पण मानतो की प्रतिनिधीत्वाचा हक्क हा वैयक्तिक स्वरूपाचा असून ते बंधन नाही ह्यातच सामावला आहे कर्मचा-यांचा मोकळेपणी हे ठरविण्याचा हक्क की प्रतिनिधीत्व द्यायचे की नाही आणि कार्यस्थळाच्या पार्टीज् मध्ये ह्या विषय़ी मुक्त भाषणाचा हक्क वापरावा की नाही ती त्यांची निवड असेल आमच्या कर्मचारी सनदेशी सुसंगतपणे आम्ही आमच्या कर्मचा-यांचे हित वाढविण्यासाठी कायद्याने मान्यताप्राप्त प्रतिनिधी बरोबर सकारात्मक रीत्या काम करतो. सहकार्य आणि परस्पर सन्मानाच्या भावनेतून आम्ही स्थानिक कायदे आणि नियमांचा आदर करून सामूहिकरीत्या वाटाघाटी करतो.

## अंमलबजावणी आणि जबाबदाऱ्या:

आमच्या परीचालनाखालील गट आणि विभागात ह्या प्रमाणकांची अंमलबजावणी आणि पूर्तता यांची जबाबदारी Magna च्या त्या गटाच्या आणि विभागाच्या वरिष्ठनेतृत्वावर असते. ह्या प्रमाणकांकडे झालेले कॉर्पोरेट दुर्लक्ष विविध मानव संसाधन परीक्षणे आणि निरीक्षण प्रक्रियांतून दाखवले जाते. Magnaचे संचालक मंडळ, त्याचे कॉर्पोरेट शासन, भरपाई आणि नामनिर्वाचन समितीद्वारे, आमच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी विषयक एकूण दृष्टीकोनावर ज्यात ही प्रमाणकेही सामावली असतात, त्यावर लक्ष ठेवून असते. आम्ही आशा करतो की आमचे व्यावसायिक भागीदार आणि सर्व पुरवठादार समान धोरणे स्वीकारतील आणि त्याचे पालन करतील. आम्ही ग्लोबल कर्मचारी प्रमाणके ओळखून त्यानुसार आपला व्यवसाय करणारे भागीदार आणि पुरवठादार शोधतच असतो.

ज्या कर्मचा-यांना ह्या तत्वांची पायमल्ली झाली असण्याचा विश्वास वाटत असेल, ते अंतर्गत सुसंस्थापित तक्रार प्रक्रियेद्वारे-जी प्रदेशानुसार बदलती असते, तत्वभंग विषयक अहवाल सादर करण्यास समर्थ असतात. Magnaअनेक संबंधित प्रस्ताव/उपाय आणि कर्मचा-यांसाठी तपास प्रक्रिया पुरवते ज्यात सामावलेल्या असतात आमच्या कर्मचारी सनदेतील ओपण डोअर प्रोसेस तसेच हाताच्या अंतरावरची कर्मचारी हॉटलाईन जी निःपक्षपाती तपास करायला जबाबदार असते आणि जेथे आवश्यक असेल तेथे उपचारात्मक कृती लागू करते. Magna ची गैर-प्रतिशोध धोरण नुसार, कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध प्रतिशोधात्मक कारवाई केली जात नाही, जो अशी रिपोर्ट करतो किंवा जो कोणत्याही तपासात अन्यथा सहकार्य करतो.

## पुढील माहितीसाठी:

पुढील माहितीसाठी आपल्या गटाच्या मानवसंसाधन खात्याच्या व्हाईस प्रेसिडेंटशी, Magnaच्या लेबर रिलेशनच्या Global संचालकाशी किंवा Magnaच्या मुख्य मानव संसाधनाधिका-याशी संपर्क साधा.

Issued: March 1, 2019

| | |
|---|---|
| Revised: | April 14, 2025 |
| Next Review: | Q1 2028 |
| Issued By: | Human Resources Legal & Labour Relations Department |
| Approved By: | Magna Compliance Council |